आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई — ४०० ०२३.
E-mail: excise_dycom_molassesalcohol@mahaonline.gov.in Tel. २२६६३६८५

विषय :- याचिका क्र.९०३/२०१३ मे. योगेश्वरी पेट्रोकेमिकल्स प्रा. लि., नाशिक.
(५१ रिट याचिकां) मध्ये वहातूक, आयात व निर्यात शुल्काबाबत.

-----

## परिपत्रक

क्रमांक:-डीवायएस-११२०१४/५००१/चार मुंबई, दिनांक ५ ऑगस्ट,२०१५.

या कार्यालयाच्या समक्रमांकाच्या दि. ११/१०/२०१४ च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालय. मुंबई यांचे दि. १३ ऑगस्ट, २०१४ चे आदेशाची प्रत पाठविण्यात आली आहे. सदर पत्रा सोबतच्या यादीत नमुद केलेले याचिकाधारक यांना मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार विप्रकृत मद्यार्काची वहातूक/ आयात/निर्यात करतांना मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम. १९५९ च्या तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची वहातूक. आयात अथवा निर्यात शुल्क आकारता येणार नाही असे आदेशीत केले आहे. तसेच सोबतच्या यादीतील याचिकाधारकांनी मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ च्या तरतूदी असंविधानिक असल्याने खारीज करण्याबाबत मा. उच्च न्यायालयास विनंती केली होती. तथापि सद्य:स्थितीत मा. उच्च न्यायलयाने त्याबाबत कोणतेही भाष्य केले नसून त्या अनुषंगाने याचिकाधारकांना कोणताही "रिलीफ" देण्यात आलेला नाही. मा. उच्च न्यायालयाने विप्रकृत मद्यार्कावर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये असे आदेशित केले आहे.

त्यामुळे सर्व अधोक्षकांना सूचना देण्यात येते की, त्यांचे अधिपत्याखालील नमुना "I" अनुज्ञप्तीधारकांच्या प्रभारी अधिका-यांनी सोबतच्या यादीतील याचिकाधारकांना विप्रकृत मद्यार्काची विक्री करतांना त्यांना वहातूक/आयात/निर्यात यापैकी जे लागू असेल ते शुल्क आकारण्यात येऊ नये. अशाप्रकारचे शुल्क जे आकारण्यात आलेले नाही त्यासाठी स्वतंत्र हिशेब नोंदवही ठेवण्यात यावी. मा. उच्च न्यायालयाने मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ हे खारीज केलेले नसल्याने सोबतच्या यादीतील याचिकाधारकांनी विप्रकृत मद्यार्काबाबत परवाना मंजूर करतांना त्यांचेकडे **संबंधित अनुज्ञप्ती असणे आवश्यक राहील** व त्यांना परवाना मंजूर करण्यासाठी सर्व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल. तथापि, त्यांचेकडून केवळ [illegible] आकारता येणार नाही.

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक ९०४५
दिनांक २९/८/१५
विभाग

T 29/8/15

( कृ.मा.प.... )

उपरोक्त सूचना सर्व अधीक्षकांनी त्यांचे अधिपत्याखालील नमुना "I" अनुज्ञप्तीधारकांचे प्रभारी अधिका-यांचे निदर्शनास आणून कोणत्याही परिस्थितीत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

( राजेश कुमार )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
२. सर्व प्रभारी अधिकारी नमुना "I".
३. सर्व नमुना "I" अनुज्ञप्तीधारक.

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.
२. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना अग्रेषित.